RNI No. MAHBIL /2009/40124

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग पाच

वर्ष ११, अंक १२ (३२)] शुक्रवार, जुलै ४, २०२५/आषाढ १३, शके १९४७ [पृष्ठे ५, किंमत : रुपये २६.००

**असाधारण क्रमांक ७५**

**प्राधिकृत प्रकाशन**

**महाराष्ट्र विधानसभेत व महाराष्ट्र विधानपरिषदेत सादर केलेली विधेयके.**

---

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय**

महाराष्ट्र विधानसभेत दिनांक **४ जुलै, २०२५** रोजी पुरःस्थापित करण्यात आलेले खालील विधेयक महाराष्ट्र विधानसभा **नियम ११६** अन्वये प्रसिद्ध करण्यात येत आहे :—

**L. A. BILL No. LXXI OF 2025.**

A BILL

TO PROVIDE FOR PAYMENT OF PENSION TO AGRICULTURISTS, ARTISANS AND LANDLESS LABOURERS IN THE STATE OF MAHARASHTRA.

**सन २०२५ चे विधानसभा विधेयक क्रमांक ७१.**

**महाराष्ट्र राज्यातील शेतकरी, कारागीर व भूमिहीन मजूर यांना निवृत्तिवेतन देण्याची तरतूद करण्यासाठी विधेयक.**

**ज्याअर्थी,** महाराष्ट्र राज्यातील शेतकरी, कारागीर व भूमिहीन मजूर यांना निवृत्तिवेतन देण्याची तरतूद करणे इष्ट आहे; **त्याअर्थी,** भारतीय गणराज्याच्या शहात्तराव्या वर्षी, याद्वारे, पुढीलप्रमाणे अधिनियम करण्यात येत आहे :–

**१.** (१) या अधिनियमास, महाराष्ट्र शेतकरी, कारागीर व भूमिहीन मजूर यांना निवृत्तिवेतन देण्याबाबत अधिनियम, २०२५ असे म्हणावे. संक्षिप्त नाव व प्रारंभ.

(२) तो संपूर्ण महाराष्ट्र राज्यास लागू असेल.

(३) तो, राज्य शासन, **शासकीय राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे नमून दिनांकास अंमलात येईल.

व्याख्या. **२.** या अधिनियमात संदर्भानुसार दुसरा अर्थ अपेक्षित नसेल तर,–

(अ) "शेतकरी" म्हणजे शेती हा जिचा व्यवसाय आहे व जी महाराष्ट्र राज्यात शेतीच्या कामामध्ये गुंतलेली आहे अशी व्यक्ती ;

(ब) "कारागीर" म्हणजे महाराष्ट्र राज्यात कुटिरोद्योग व ग्रामीण विकासाचे कोणतेही काम, हस्तव्यवसाय, विणकाम तथा अन्य ग्रामीण उद्योग व्यवसायांमध्ये गुंतलेली व्यक्ती ;

(क) "भूमिहीन मजूर" म्हणजे, जिच्याजवळ स्वतःची शेतीची जमीन नाही व ज्या व्यक्तीला जमीन मालकाच्या जमिनीत किंवा जमिनीच्या बाबतीत शेतीसंबंधीची कामे केल्याबद्दल किंवा करण्यासाठी अशा जमीन मालकाकडून मजुरी दिली जाते अशी व्यक्ती.

हा अधिनियम कोणकोणत्या व्यक्तींना लागू होईल. **३.** हा अधिनियम, निवृत्तिवेतनासाठी अर्ज केल्याच्या दिनांकाच्या लगतपूर्वी किमान पाच वर्ष महाराष्ट्र राज्यात सलग वास्तव्य करणारे शेतकरी, कारागीर व भूमिहीन मजूर यांना लागू होईल.

निवृत्तिवेतन देणे. **४.** ज्याच्या वयाला पंचावन्न वर्ष पूर्ण झाली आहेत व ज्याने निवृत्तिवेतनासाठी अर्ज केला आहे अशा प्रत्येक शेतकऱ्यास, कारागीरास व भूमिहीन मजुरास दरमहा एक हजार रुपये निवृत्तिवेतन, राज्याच्या एकत्रित निधीमधून देण्यात येईल.

निवृत्तिवेतन घेण्यास अपात्र होणे. **५.** या अधिनियमान्वये, पुढीलपैकी कोणतीही व्यक्ती निवृत्तिवेतन घेण्यास अपात्र ठरेल :-

(अ) ज्या व्यक्तीची, वृद्ध, आजारी व विकलांग यांची काळजी घेण्यासाठी चालविल्या जाणाऱ्या कोणत्याही संस्थेद्वारे काळजी घेण्यात येत असेल अशी व्यक्ती; किंवा

(ब) ज्या व्यक्तीच्या कुटुंबातील एक व्यक्ती शासकीय / निमशासकीय सेवेत किंवा सांविधानिक महामंडळाच्या सेवेत कामावर असेल अशी व्यक्ती.

नियम करण्याचा अधिकार. **६.** (१) राज्य शासनास **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे, या अधिनियमाची प्रयोजने पार पाडण्यासाठी नियम करता येतील.

(२) या अधिनियमान्वये केलेले सर्व नियम ते अशा प्रकारे करण्यात आल्यानंतर शक्य तितक्या लवकर राज्य विधानमंडळाचे अधिवेशन चालू असताना एकाच अधिवेशनात किंवा लागोपाठच्या दोन अधिवेशनात मिळून एकूण तीस दिवसांची होईल इतक्या मुदतीकरिता, राज्य विधानमंडळाच्या प्रत्येक सभागृहासमोर ठेवण्यात येतील, आणि ज्या अधिवेशनात ते अशा रीतीने ठेवण्यात आले असतील ते अधिवेशन किंवा त्याच्या लगतनंतरचे अधिवेशन समाप्त होण्यापूर्वी त्यात कोणताही फेरफार करण्यास दोन्ही सभागृहे सहमत होतील किंवा तो नियम करण्यात येऊ नये म्हणून दोन्ही सभागृहे सहमत होतील, तर ते नियम तत्पश्चात अशा सुधारित स्वरूपातच अंमलात येतील किंवा यथास्थिती, अंमलात येणार नाहीत, तथापि, अशी कोणतीही सुधारणा किंवा विरुपण यामुळे त्या नियमान्वये त्यापूर्वी करण्यात आलेल्या किंवा वगळण्यात आलेल्या कोणत्याही गोष्टींच्या विधिग्राह्यतेस बाधा येणार नाही.

## उद्देश व कारणे यांचे निवेदन

महाराष्ट्रातील पासष्ट टक्के लोक खेड्यात राहतात. प्रत्येक खेडे हे ज्यांच्याकडील अर्थार्जनाची साधने अतिशय तुटपुंजी आहेत अशा शेतकऱ्यांचे, कारागिरांचे आणि भूमिहीन मजुरांचे मिळून बनलेले आहे. हे लोक शारीरिक कष्टाची कामे करतात, मात्र, विशिष्ट वयानंतर त्यांना हे काम करणे शक्य होत नाही. या तुटपुंज्या कमाईमधून ते त्यांच्या वार्धक्याच्या काळासाठी बचतही करू शकत नाहीत. म्हातारपणी त्यांना अनेक अडचणींना तोंड द्यावे लागते आणि कधी कधी तर हातातोंडाची गाठ घालणेही त्यांना शक्य होत नाही. अशा शोचनीय परिस्थितीत त्यांना राज्य शासनाच्या मदतीची अत्यंत आवश्यकता आहे. समाजाची, तसेच राष्ट्राची त्यांनी केलेली सेवा विचारात घेता त्यांच्या वार्धक्याच्या काळात त्यांना आर्थिक स्वरूपाचे सहाय्य देणे आवश्यक आहे.

वरील उद्दिष्ट साध्य करणे हा या विधेयकाचा हेतू आहे.

**विधान भवन :**<br>
मुंबई,<br>
दिनांक २ जुलै २०२५.

**सुधीर मुनगंटीवार,**<br>
प्रभारी सदस्य.

## वित्तीय ज्ञापन

विधेयकाच्या खंड ४ अन्वये वयाचे पंचावन्न वर्षे पूर्ण करणाऱ्या व निवृत्तिवेतनासाठी अर्ज केलेल्या पात्र शेतकरी, कारागीर व भूमिहीन मजूर यांना प्रत्येकी दरमहा १,००० रुपये ( अक्षरी एक हजार रुपये फक्त ) एवढ्या रकमेचे निवृत्तिवेतन देण्याची तरतूद करण्यात आली असून त्यानुसार पात्र शेतकरी, कारागीर व भूमिहीन मजूर यांना द्यावयाच्या निवृत्तिवेतनासाठी राज्याच्या एकत्रित निधीतून आवर्ती खर्च होण्याची शक्यता आहे. सद्यःस्थितीत या अधिनियमाच्या अधिनियमितीवरील खर्च नमूद करणे शक्य नाही.

## वैधानिक अधिकार सोपविण्यासंबंधीचे ज्ञापन.

या विधेयकात वैधानिक अधिकार सोपविण्यासंबंधीचे पुढील प्रस्ताव अंतर्भूत आहे –

**खंड १(३)–** या खंडान्वये, उक्त अधिनियम, ज्या दिनांकास अंमलात येईल तो दिनांक **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे नेमून देण्याचा अधिकार राज्य शासनाकडे घेण्यात आला आहे.

**खंड ६ (१)–** या खंडान्वये अधिनियमाचे प्रयोजने पार पाडण्यासाठी नियम तयार करावयाचे अधिकार राज्य शासनाकडे घेण्यात आले आहेत.

**खंड ६ (३)–** या खंडान्वये तयार करण्यात आलेले नियम विधानमंडळापुढे ठेवण्याचा अधिकार राज्य शासनाकडे घेण्यात आला आहे.

वैधानिक अधिकार सोपविल्यासंबंधीचे उपरोल्लेखित प्रस्ताव सामान्य स्वरुपाचे आहेत.

**विधान भवन :**
मुंबई,
दिनांक ४ जुलै, २०२५.

**जितेंद्र भोळे,**
सचिव-१,
महाराष्ट्र विधानसभा.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004. EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.